# पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

डॉ. एस. डी. चव्हाण
विभाग प्रमुख

दूरध्वनी क्र. ०७२४-२२५८००१
ई-मेल : hdahdspdkv@gmail.com

जा. क्र. /वि. प्र. /प. सं. व दु. शा. / 859 /२०२२
दिनांक:-०५/०८/२०२२

**पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**
**येथील तलावाची जाहीर लिलाव सूचना**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावर असलेल्या नवीन तलावाचे माहे ऑगस्ट-२०२२ ते जून-२०२४ या कालावधी करिता मासेमारी हक्क देण्यासाठी दिनांक १२.०८.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या विभागाच्या कार्यालयात जाहीर लिलाव करण्यात येईल तरी इच्छुक व्यक्तींनी सदर लिलावास हजर राहावे.

लिलावात बोली बोलण्यासाठी इच्छुक व्यक्तीस अग्रिम रक्कम रु. ५०००/- भरावी लागेल.

लिलावाच्या अटी व नियम पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाहावयास मिळतील.

विभाग प्रमुख
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील नवीन शेततळ्याचा मत्स्य पालन करिता जाहीर लिलाव

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत असलेला प्रक्षेत्रावरील नवीन तलाव सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी मासेमारी करिता देण्यासाठी जाहीर लिलावाच्या अटी खालीलप्रमाणे आहे.

1. पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत असलेल्या प्रक्षेत्रावरील नवीन शेततळ्याचा मत्स्य पालनकरिता जाहीर लिलाव ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर करण्यात येईल.
2. ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर कमीत कमी तिन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे हजर असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल. तसेच तिन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर राहिल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील.
3. लिलावामध्ये भाग घेण्याकरिता लिलावाची प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी रु. ५०००/- अनामत रक्कम म्हणून नगदी भरावी लागेल.
4. ज्या व्यक्तींचे नावे रुपये ५०००/- अनामत रक्कम भरली असेल फक्त त्या व्यक्तींनाच लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील लिलावाच्या ठिकाणी हजर राहता येईल व बोली बोलता येईल.
5. लिलावाची अंतिम बोली मान्य झाल्यानंतर, लिलाव घेतला असेल त्याचे व्यतिरिक्त सर्वांची लिलावामध्ये भाग घेण्याकरिता जमा केलेली रुपये ५०००/- अनामत रक्कम परत करण्यात येईल.
6. लिलावाची अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार लिलाव समितीस व मा. विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना राहतील.
7. लिलाव घेणा-यास अंतिम बोलीची १०० टक्के रक्कम लिलावाच्या दिवशी त्याच ठिकाणी भरावी लागेल अन्यथा लिलाव समितीस एकतर्फी निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार राहतील.
8. लिलाव घेणा-यास अंतिम बोलीचे रकमेच्या १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून लिलावाच्या दिवशीच भरणा करावी लागेल (लिलाव रकमेच्या व्यतिरिक्त).
9. लिलावास अंतिम मान्यता मा. विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांची राहील. अंतिम मान्यता मिळाल्याशिवाय लिलाव प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
10. शेततळ्याची मत्स्य पालनाकरिता अंतिम मान्यता मिळाल्यानंतर लिलाव घेणा-या व्यक्तीस मत्स्य बीज टाकण्यापूर्वी रु. १००/- चे स्टंम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करून द्यावा लागेल.
11. विद्यापीठ मालमत्तेस कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता लिलाव घेणा-या व्यक्तीस घ्यावी लागेल. विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करून द्यावी लागेल अन्यथा सुरक्षा ठेव (Security Deposit) जप्त करण्यात येईल. तसेच याबाबतचा मा.

विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

12. मत्स्य पालन करण्याकरिता मत्स्य बीज व मत्स्य खादय टाकण्याची संपूर्ण जबाबदारी हि लिलाव घेणा-या व्यक्तीची राहील.
13. मत्स्य पालन करतांना सुरक्षतेबाबतची संपूर्ण जबाबदारी हि लिलाव घेणा-या व्यक्तीची राहील व आसपासच्या आवागमनास अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. चोरी, जीवित हानी, नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे काही नुकसान झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
14. मत्स्य पालन करतांना लिलाव घेणा-या व्यक्तीने रखवाली व मत्स्यपालन निगडीत कामाकरिता कोणाची नियुक्ती केली असेल, अशा व्यक्तींची तपशीलवार माहिती प्रभारी अधिकारी, वैरण यांना द्यावी लागेल. पुरविण्यात आलेल्या तपशीलवार माहितीनुसार सदर व्यक्तींची गेटपास तयार करून देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांनाच प्रवेश राहील.
15. लिलाव प्रक्रीये दरम्यान कोणत्याही कारणावरून लिलाव समिती व लिलावात भाग घेणा-या व्यक्तींमध्ये वाद निर्माण झाल्यास अथवा लिलाव प्रक्रियेला अंतिम मान्यता मिळाल्यापासून ते लिलावाचे अंतिम कालावधी दरम्यान प्रक्षेत्रावर वादविवाद उद्भवल्यास मा. विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
16. मत्स्य पालनाकरिता लिलाव करण्यात आलेल्या शेततळ्यातून प्रक्षेत्रावरील चारा पिकांना आवश्यकतेप्रमाणे सिंचनाकरीता पाणी वापरण्यात येईल व याचे संपूर्ण अधिकार हे विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे राहतील. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.
17. सदर तलाव संपूर्णतः नैसर्गिक पाण्यावर अवलंबून असून जाहीर लिलावाच्या दिवशी सदर तलावात जेवढे पाणी जमा आहे त्या शिवाय पाण्याची पातळी वाढण्यासाठी विद्यापीठातर्फे कोणत्याही प्रकारचा पाणी पुरवठा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
18. लिलाव करण्यात आलेले शेततळे हे फक्त मत्स्य पालनाकरिता मर्यादित राहील. शेततळ्याचे ठिकाणी अथवा विद्यापीठ प्रक्षेत्रावर मत्स्य विक्री करण्यास परवानगी मिळणार नाही. लिलाव घेणा-या व्यक्तीस मत्स्य विक्री हि विद्यापीठ परिसराच्या बाहेरच करावी लागेल.
19. लिलाव समितीने सुचविल्याप्रमाणे व मा. विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांनी मान्यता दिलेल्या मत्स्य पालन कालावधीचे अंतिम तारखेनंतर लिलाव घेणा-यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता प्रभारी अधिकारी, वैरण, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या नावाने अर्ज करावा लागेल. त्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करून सुरक्षा ठेव (Security Deposit) परत करण्यात येईल.
20. दि. ३०.०६.२०२४ पर्यंत अन्यथा पाणी संपण्याचा कालावधी जो आधी असेल तो पर्यंतच मासेमारी हक्क देण्यात येईल. त्यानंतर लिलाव घेणा-याचा तलावावर कोणताही हक्क राहणार नाही.
21. मत्स्य काढून नेण्याची <u>अंतिम तारीख</u> दि. <u>३०.०६.२०२४</u> राहील.

**विभाग प्रमुख**
**पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,**
**डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला।**